**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल

**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S. (पोलीस ठाणे):** सदर बाज़ार **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0817 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/10/2025 03:10 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence(गुन्हयाची घटना):**

1 **Day (दिवस):** सोमवार **Date from (दिनांक पासून):** 13/10/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 13/10/2025

**Time Period (कालावधी):** प्रहर ६ **Time From (वेळेपासून):** 17:15 तास **Time To (वेळेपर्यंत):** 17:50 तास

2 **Day (दिवस):** बुधवार **Date from (दिनांक पासून):** 15/10/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 15/10/2025

**Time Period (कालावधी):** प्रहर ६ **Time From (वेळेपासून):** 17:15 तास **Time To (वेळेपर्यंत):** 18:00 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 16/10/2025 **Time (वेळ):** 02:30 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 011 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 16/10/2025 03:10 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. (a) **Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पश्चिम, 02 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** एम्पलॉयमेंट चौक , सोलापुर,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**2.** **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पश्चिम, 2 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** मा आयुक्त कर्मचारी भविष्य निधी, कार्यालय जवळ , सोलापुर,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6.** **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

**(a)** **Name (नाव):** प्रशांत रामचंद्र चौगुले

**(b)** **Guardian's Name (चे नाव ):** रामचंद्र चौगुले

**(c)** **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1983 **(d) Nationality (राष्‍ ट्रीयत्‍ व):**भारत

**(e)** **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f)** **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g)** **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

**(h)** **Occupation (व्यवसाय):**

**(i)** **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग , सोलापूर, सदर बाज़ार, सोलापुर शहर, महाराष्ट्र, भारत |

| | | |
|---|---|---|
| 2 | स्थायी पता | नेम लाचलुचपत प्रतिबंधक विभाग , सोलापूर, सदर बाज़ार, सोलापुर शहर, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** 

**Mobile (मोबाइल क्र.):** 91-9823225465

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | सलीम हशरफ शेख | | पालक चे नाव : हशरफ शेख | 1. 230,उत्तर सदर बझार,Town/Village (शहर / गाव): सोलापूर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): सदर बाज़ार,District (जिल्हा): सोलापुर शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रोख रक्कम भारतीय चलनातील मधील विविध नोटा | 5,000.00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 5,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

| **S. No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.)** |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद तारीख 16/10/2025

मी. श्री. प्रशांत रामचंद्र चौगुले, वय - 42 वर्षे व्यवसाय नोकरी, पद-पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर मो. नं. 9823225465.

मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर युनिट येथे सन मे/2025 पासून पोलीस उपअधीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि. 11/10/2025 रोजी माझे मोबाईल क्र. 9823225465 या वर मोबाईल क्र. 9226478634 वरून फोन आला व त्यांनी त्यांचे नाव श्री. अभिजीत चंद्रकांत वाडेकर, रा. पंढरपूर असल्याचे सांगून त्यांना लोकसेवकाकडून लाचेची मागणी होत असून लोकसेवक यांनी त्यांना दि. 13/10/2025 रोजी सोलापूर येथे भेटायला बोलाविले असल्याचे सांगुन त्यांची लाचेच्या संबधी तक्रार असल्याचे त्यांनी सांगीतले. त्यांना आम्ही दि. 13/10/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, रंगभवन येथे येण्यास सांगीतले. त्याप्रमाणे दि. 13/10/2025 रोजी 11/00 वा. कार्यालयीन अंमलदार यांचे मार्फत दोन शासकिय पंच उपलब्ध करून देणेबाबत मा. अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधीकरण, सिंचन भवन सोलापूर यांना पत्र दिले.

त्यानंतर दि. 13/10/2025 रोजी 12/30 वा. चे सुमारास पंच (1) श्री. हरिश विठोबा शेरखाने, वय - 39 वर्षे, पद मोजणीदार, पाटबंधारे उपविभाग, सोलापूर रा. होटगी गाव ता. दक्षीण सोलापूर जि. सोलापूर व (2) श्री. शमुवेल विजयकुमार कांबळे, वय 47 वर्षे, पद कनिष्ठ लिपीक, नेमणूक - अधीक्षक अभियंता लाभक्षेत्र विकास प्राधीकरण, सिंचन भवन सोलापूर, रा ब्लॉक नं. 73/15 हेजनपूर लष्कर, उत्तर सदर बझार सोलापूर हे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर युनिट येथील कार्यालयातील आमचे दालनात आमचे समक्ष उपस्थित झाले. त्यानंतर 15/30 वा. सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर येथील कार्यालयात आमचे समक्ष एक व्यक्ती उपस्थित झाली. त्यांनी त्यांचे नाव श्री. अभिजीत चंद्रकांत वाडेकर, रा. पंढरपूर असे असल्याचे सांगुन त्यांची लाचेसंबधी तक्रार असल्याचे सांगून त्यांनी मला दि. 11/10/2025 रोजी फोन केला असल्याचे सांगीतले.

त्यावेळी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात उपस्थित असलेले शासकिय पंच यांना आमचे दालनात बोलावून घेतले. तसेच आमचे दालनात उपस्थित तक्रारदार श्री. अभिजीत चंद्रकांत वाडेकर व वर नमुद दोन्ही पंच सापळा पथकातील पो.नि. लांभाते, पोह/71 शिरिषकुमार सोनवणे, पोह/1749 श्रीराम घुगे, पोशि/862 राजू पवार, पोह/ 158 पकाले यांची आपसात ओळख करुन दिली. त्यानंतर वर नमूद पंच साक्षीदार यांना आम्ही तक्रारदार श्री. अभिजीत चंद्रकांत वाडेकर यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून पुढील कार्यवाही करणेकामी पंच म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता त्यास दोन्ही पंच साक्षीदार यांनी होकार दिला. त्याप्रमाणे पंच क्र. 1 म्हणून श्री. हरिश विठोबा शेरखान व पंच क्र. 2 म्हणून श्री. शमुवेल विजयकुमार कांबळे हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार यांनी त्यांची तक्रार लेखी स्वरुपात दिली ती पुढीलप्रमाणे.

"मी श्री. अभिजीत चंद्रकांत वाडेकर, वय. 41 वर्षे, व्यवसाय- व्यापार शिक्षण- 10 वी पास, रा. 3259 उज्वला सेतु खाली, महाव्दार पोलीस चौकी समोर, पंढरपूर ता. पंढरपूर जि. सोलापूर मो. नं. 9226478634मी वरील ठिकाणी राहणेस असुन माझा भाऊ नामे कै. अमोल चंद्रकांत वाडेकर हा पंढरपूर मधील विठ्ठल रुक्मीणी मंदीर येथे सन 2014 ते 2023 पर्यंन्त शासनाने नेमलेल्या 10 पुजा-या पैकी एक पुजारी म्हणून काम करत होता. तो दिनांक 30/07/2023 रोजी मयत झाला आहे. त्याची पत्नी नामे स्नेहा आमोल वाडेकर वय 38 वर्षे, यांनी भाऊ अमोल वाडेकर याचा पीएफ फरक, मृत्यु विमा व पेन्शनचे बील काढणेकरिता मा. आयुक्त कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी, कार्यालय सुरवसे टॉवर रेल्वे लाईन, सोलापूर यांचेकडे दिनांक 12/05/2025 रोजी अर्ज दिलेला आहे. त्याचा क्रमांक 1611892/10069 असा असुन सदर अर्जाचा पाठपुरावा मी करीत आहे. मा. आयुक्त, कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी, कार्यालय येथील पठाण यांनी त्यांचा मोबाईल क्रमांक 8999604057 यावरुन माझी वहीनी नामे स्नेहा वाडेकर यांना त्यांचे मोबाईल क्रमांक 8788638810 यावर दि. 11/10/2025 रोजी सकाळी 09/00 ते 09/30 वा. दरम्यान फोन करुन त्यांचेकडुन माझा नंबर घेवुन पठाण यांनी त्यांचे मोबाईल क्रमांकवरुन मला माझे वरील मोबाईल क्रमांकवर फोन केला व सांगितले की, तुमच्या भावाचे पी.एफ. फरक, मृत्यु विमा व पेन्शनचे बील मधील पहीला हप्ता 38000 रु तुमच्या खात्यावर टाकले आहेत. पुढचे बिल काढायचे असल्यास चहा पाणीकरिता मला व साहेबांना मिळणा-या रकमेचे 20 टक्के द्यावे लागतील असे सांगुन किती रक्कम द्यायाची त्याबाबत बोलणी करण्याकरिता आज दिनांक 13/10/2025 या रोजी रंगभवन चौक, सोलापूर येथे भेटणेकरिता या असे सांगितले आहे. मा. आयुक्त कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी, कार्यालय येथील पठाण यांना आंम्ही त्यांचे मागणी प्रमाणे पैसे दिले नाहीत तर ते माझ्या भावाचे पी.एफ. फरक, मृत्यु विमा व पेन्शनचे पुढील बील काढणार नाहीत. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही. त्यामुळे त्यांचेवर आपले विभागाकडुन योग्य ती कारवाई करावी ही विनंती. माझेत व लोकसेवक पठाण यांचेत कोणताही आर्थिक व्यवहार नाही. तथा आमचेमध्ये कोणताही आर्थिक व्यवहार झालेला नाही. तसेच माझे शिक्षण 10 वी पास झाले असुन ,मला लिहीता वाचता येते आहे. सदरची तक्रार मी स्वहस्ताक्षरात स्वइच्छेने लिहुन दिली असुन बरोबर आहे. तरी त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई व्हावी हि विनंती" वगैरे मजकुराची तक्रार तक्रारदार यांनी स्वहस्ताक्षरात लिहून दिली. नंतर सदरची तक्रार आम्ही व वर नमुद पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या.

लोकसेवक पठाण यांनी तक्रारदार श्री. वाडेकर यांना दि. 13/10/2025 रोजी सोलापूर शहरातील रंगभवन चौक, येथील चर्च समोर बोलविले असल्याने तक्रारदार श्री. वाडेकर यांचे तक्रारीनुसार लोकसेवक पठाण यांचेवर लाच मागणीच्या अनुषंगाने पडताळणी कारवाई करण्याकरिता आम्ही तक्रारदार श्री. वाडेकर व दोन्ही पंच साक्षीदार यांना आमचेकडील व्हाईस रेकॉर्डर व पॅकिंग मधील 08 जीबी चे नवीन मेमरीकार्ड दाखवुन त्यांचा वापर व उपयोग समजावून सांगीतला. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. वाडेकर यांचेकडे लोकसेवक पठाण हे लाच मागणी करतात अगर कसे ? याबाबतची पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविले. पडताळणीसाठी पंच क्र. 1 म्हणुन श्री. हरिश विठोबा शेरखाने पंच क्र. 2 म्हणून श्री. शमुवेल विजयकुमार कांबळे हे काम पाहतील असे ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 शेरखाने पंच क्र. 02 कांबळे यांचे निवेदन घेण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये ईव्हिएम कंपनीचे नवीन सिलबंद

मेमरीकार्ड त्यांचे पाकिटातून बाहेर काढले ते व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले. व्हॉईस रेकॉर्डर चालू करून त्याबाबत माहिती दिली तसेच त्याचे इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे उपस्थित सर्वांची खात्री करून दिली.

त्यानंतर तक्रारदार श्री. वाडेकर व पंच क्र. 1 श्री. शेरखाने पंच क्र. 02 श्री. कांबळे यांचे पडताळणी निवेदन घेतले ती वेळ 17.05 वा ची होती. त्यानंतर तक्रारदार श्री. वाडेकर यांना लोकसेवक पठाण यांचेकडे लाच मागणी पडताळणी कामी पाठवण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही उपस्थित पंच साक्षीदार व तक्रारदार यांना पुढील पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या व व्हाईस रेकॉर्डर पुन्हा चालू करून तो तक्रारदार श्री. वाडेकर यांनी परिधान केलेल्या शर्टचे आतील बाजुस सेफटी पिन च्या सहाय्याने लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्र. 01 श्री. शेरखाने यांचेसह पडताळणीकामी तक्रारदार यांची काळया रंगाचे होंडा शाईन कंपनीचे मोटार सायकल क्र. एम एच 13.डी.यू.5912 वरून सोलापूर शहरातील रंगभवन चौक, येथील चर्च समोर रवाना केले त्यावेळी व्हाईसरेकॉर्डर चालू केला ती वेळ 17.15 वा ची होती.

त्यानंतर आम्ही व पंच क्र. 02 असे लाचलूचपत प्रतिबंधक कार्यालय, सोलापूर येथे थांबुन राहिलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं. 01 असे लाचलूचपत प्रतिबंधक कार्यालय, सोलापूर येथील कार्यालयात परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचे अंगावरील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 17.50 वा. ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र. 01 यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले ते आमच्या समक्ष पंच क्र. 2 श्री. कांबळे यांना सांगा असे सांगीतले. त्यावेळी त्यांनी सांगितले की, “मी व तक्रारदार वाडेकर असे तक्रारदार यांचे मोटार सायकल वरुन रंगभवन चौक, येथील चर्च समोर गेलो. सदर ठिकाणी तक्रारदार वाडेकर यांनी लोकसेवक पठाण यांना त्यांचे मोबाईल वरुन स्पीकर ऑन करुन फोन लावला. त्यावेळी लोकसेवक पठाण यांनी तक्रारदार यांना एम्प्लॉयमेंट चौक येथील लोकप्रिया हॉटेल येथे बोलाविले. त्याप्रमाणे मी व तक्रारदार वाडेकर असे एम्प्लॉमेंट चौकातील लोकप्रिया हॉटेल येथे गेलो. सदर ठिकाणी लोकसेवक पठाण यांची भेट झाली. त्यावेळी तक्रारदार वाडेकर यांनी त्यांचे मयत भाऊ अमोल वाडेकर यांचे मृत्यु विमा, पी.एफ. फरक व पेन्शनचे बील बाबत चर्चा करीत असताना लोकसेवक पठाण यांनी “साहेबांशी रिलेशन चांगल हाय..”असे म्हणाले. त्यावर तक्रारदार वाडेकर यांनी साहेबांच नांव काय असे विचारले असता लोकसेवक पठाण यांनी “नांव तस सांगता येत नाही. पण साहेबांना सांगुन करुन घेवू त्याकरीता 20 टक्के रक्कम दयावे लागेल असे म्हणाले. त्यावर तक्रारदार वाडेकर यांनी “पी.एफ किती येणार आता आपल्याला” असे विचारले असता “ती अमाऊंट तुम्हाला उद्या किंवा परवा सांगेन” असे म्हणाले. त्यावर तक्रारदार वाडेकर यांनी “तुम्ही साहेबांची आमची भेट घालून दया आम्ही त्यांच्याकडे विनंती करतो” असे म्हणाले. त्यावर लोकसेवक पठाण यांनी “साहेब शक्यतो भेटणार नाही हे काम परफेक्ट होणार कामाची गॅरंटी हाय 100 टक्के” असे म्हणाले. त्यावर तक्रारदार वाडेकर यांनी “एक लमसम अमाऊंट सांगा बाबा ..ऐवढे ऐवढे दयायचे किती दयायचे सांगा तुम्ही” असे म्हणाले. त्यावर लोकसेवक पठाण यांनी “बर..ठिक हाय चालतय ..अ..तुम्ही एक थोड पहिले जमा करावे लागतील पैसे” असे म्हणाले. त्यावर तक्रारदार वाडेकसेवक पठाण यांनी “इंडिया टि चे समोर आयकॉन एंटरप्रायझेस छोटस दुकान हाय गाळा म्हणुन” असे म्हणाले. त्यावर तक्रारदार वाडेकर यांनी लोकसेवक पठाण यांना साहेबांची भेट घालून देण्याची विनंती केली. त्यावर लोकसेवक पठाण यांनी “फोन वर बोलतो तुम्हाला

कळवितो..अमाऊंट आणि पैसे.. एक थोडी तर जमा करावी लागणार ना मला नाही तिथ काम चालु करायला" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार वाडेकर यांनी "ठिक हाय असे" म्हणाले. त्यावर लोकसेवक पठाण यांनी "एक पाच-दहा हजार तर जमा करायला लागेल ना" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार वाडेकर यांनी आज असे विचारले त्यावर पठाण यांनी "आज नाही उद्या परवा" असे म्हणाले.त्यावर तक्रारदार वाडेकर यांनी उद्या परवा असे विचारले असता लोकसेवक पठाण यांनी "एक दहा हजार पर्यत जमा करा" असे म्हणाले. त्यावर तक्ररदार वाडेकर यांनी "फार होतय ओ साहेब" असे म्हणाले. त्यावर लोकसेवक पठाण यांनी "ठिक हाय पाच हजार जमा करा" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार वाडेकर यांनी "शब्द ..शब्द हाय आमचा 100 s देणार तुम्हाला" असे म्हणाले. त्यावर लोकसेवक पठाण यांनी "ठिक हाय मी फोन करतो तुम्हाला ..चालतय" असे म्हणाले. त्यानंतर मी व तक्रारदार वाडेकर असे त्यांचेकडील मोटार सायकल वरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय सोलापूर येथील कार्यालयात परत आलो असे सांगीतले. कर यांनी "तस कस ओ साहेब पहिल्यांदा जमा करणार" असे म्हणाले. त्यावर लोकसेवक पठाण यांनी "त्या एकाकडे जमा करा पैसे..तुमचे काम झाल्यावर तुम्ही त्याला सांगा मला पैसे दयायला जर ते काम झाल नाही तर तुमचे पैसे परत आपल एक दुकान हाय" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार वाडेकर यांनी कुठे असे विचारले. त्यावर लोकसेवक पठाण यांनी "इंडिया टि चे समोर आयकॉन एंटरप्रायझेस छोटस दुकान हाय गाळा म्हणुन"

असे म्हणाले. त्यावर तक्रारदार वाडेकर यांनी लोकसेवक पठाण यांना साहेबांची भेट घालून देण्याची विनंती केली. त्यावर लोकसेवक पठाण यांनी "फोन वर बोलतो तुम्हाला कळवितो..अमाऊंट आणि पैसे.. एक थोडी तर जमा करावी लागणार ना मला नाही तिथ काम चालु करायला" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार वाडेकर यांनी "ठिक हाय असे" म्हणाले. त्यावर लोकसेवक पठाण यांनी "एक पाच-दहा हजार तर जमा करायला लागेल ना" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार वाडेकर यांनी आज असे विचारले त्यावर पठाण यांनी "आज नाही उद्या परवा" असे म्हणाले.त्यावर तक्रारदार वाडेकर यांनी उद्या परवा असे विचारले असता लोकसेवक पठाण यांनी "एक दहा हजार पर्यत जमा करा" असे म्हणाले. त्यावर तक्ररदार वाडेकर यांनी "फार होतय ओ साहेब" असे म्हणाले. त्यावर लोकसेवक पठाण यांनी "ठिक हाय पाच हजार जमा करा" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार वाडेकर यांनी "शब्द ..शब्द हाय आमचा 100 s देणार तुम्हाला" असे म्हणाले. त्यावर लोकसेवक पठाण यांनी "ठिक हाय मी फोन करतो तुम्हाला ..चालतय" असे म्हणाले. त्यानंतर मी व तक्रारदार वाडेकर असे त्यांचेकडील मोटार सायकल वरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय सोलापूर येथील कार्यालयात परत आलो असे सांगीतले.

त्यानंतर तक्रारदार वाडेकर यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी पंच क्र. 01 शेरखाने यांचेप्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण ऐकले असता ते पंच क्र. 1 व तक्रारदार यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली.

एकंदरीत तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारी वरून तक्रारदार यांना लोकसेवक पठाण यांचेकडे दि. 13/10/2025 रोजी पडताळणी कामी पाठवले असता सदर पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांना त्यांच्या भावाचे मृत्यु विमा, पीएफ फरक व पेन्शनचे बील काढून देणेकरिता लोकसेवक पठाण यांनी

ॲडव्हान्स म्हणून दहा हजार रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती पाच हजार रुपये लाच मागणी केल्याचे स्पष्ट झाले. तसेच बीलची मिळणार रक्कम किती आहे व त्याचे वीस टक्के किती रुपये होतात ते दि 14/10/2025 रोजी सांगतो असे सांगीतले असल्याने उदईक दि 14/10/2025 रोजी पुन्हा लोकसेवक पठाण यांना तक्रारदार वाडेकर यांनी भेटून त्यांचे साहेब कोणते आहेत याची माहिती घेवुन त्यांची भेट घेवून पडताळणी करून पुढील कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविले. त्यानंतर तक्रारदार वाडेकर व पंच क्र. 01 श्री. शेरखाने व पंच क्र. 02 श्री. कांबळे यांना दि. 14/10/2025 रोजी सकाळी 11/00 वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर येथील कार्यालयात आमचे समक्ष उपस्थित राहणेबाबत व दि. 13/10/2025 रोजी झालेल्या घटनेबाबत गोपनीयता बाळगणेबाबत सुचना देवून त्यांना घरी पाठविण्यात आले.

दि. 14/10/2025 रोजी सकाळी 11.00 वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर येथे दोन्ही पंच उपस्थित झाले. त्यानंतर सुमारे 14/30 वा. सुमारास तक्रारदार अभिजीत वाडेकर हे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर कार्यालयात आले. त्यावेळी आम्ही पुन्हा आमची, तक्रारदार व पंच यांची ओळख करुन दिली. त्यावेळी तक्रारदार वाडेकर यांनी सांगीतले की, दिनांक 13/10/2025 रोजी मी दिलेल्या तक्रारीमधील लोकसेवक पठाण यांचा मला फोन आला होता. त्यावेळी त्यांनी मला दि. 14/10/2025 रोजी त्यांचे साहेबांची भेट घेण्यास सांगीतले आहे असे तक्रारदार वाडेकर यांनी सांगीतले. त्यावेळी आम्ही तक्रारदार वाडेकर यांना लोकसेवक पठाण यांचे साहेबांची कोठे भेट घेणार आहेत असे विचारले असता त्यांनी मा. आयुक्त, कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी, कार्यालय सुरवसे टॉवर रेल्वे लाईन, सोलापूर येथे भेटायचे आहे असे सांगीतले.

तक्रारदार श्री. वाडेकर यांचे तक्रारीनुसार लोकसेवक पठाण याचे साहेबांची भेट घेवुन त्यांचेवर पडताळणी कारवाई करण्याकरिता आम्ही तक्रारदार श्री. वाडेकर व दोघा पंच साक्षीदार यांना आमचेकडील व्हॉईस रेकॉर्डर दाखवुन त्यांचा वापर व उपयोग पुन्हा समजावून सांगीतला. दिनांक 13/10/2025 रोजी वापरण्यात आलेले मेमरी कार्ड पुढील कारवाई करिता वापरत असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही पडताळणी कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार वाडेकर व पंच क्र. 01 शेरखाने तसेच पंच नं. 2 कांबळे यांचे निवेदन व्हाईस रेकॉर्डव्दारे ध्वनीमुद्रीत करुन घेतले ती वेळ 15.16 वा. ची होती. त्यानंतर लोकसेवक पठाण यांची समक्ष पडताळणी कारवाई करण्याचे अनुषंगाने व तक्रारदार श्री. वाडेकर यांनी सांगीतल्याप्रमाणे लोकसेवक पठाण यांनी तक्रारदार यांना मा. आयुक्त, कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी, कार्यालय सुरवसे टॉवर रेल्वे लाईन, सोलापूर बोलविले असल्याने आम्ही पडताळणी कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार व दोन्ही पंचांना योग्य त्या सुचना दिल्या. दरम्यान तक्रारदार वाडेकर यांचे मोबाईल क्रमांक 9226478634 वर लोकसेवक पठाण यांचा 15.23 वा. फोन आला. त्यावेळी आम्ही तक्रारदार वाडेकर यांना त्यांचा मोबाईलचा स्पिकर ऑन करुन बोलणे करावे अशा सूचना दोन्ही पंचासमक्ष देवून आमचेकडील व्हॉईसरेकॉर्डर चालु करून तक्रारदार व पलीकडून बोलणारा इसम यांचेमध्ये संभाषण झाले. सदरचे संभाषण हे स्पिकर ऑन असल्याने सर्वांनी ऐकले. त्यामध्ये लोकसेवक पठाण यांनी "आलाव का" असे विचारले असता तक्रारदार वाडेकर यांनी "15 ते 20 मिनीटीमध्ये येतो" असे म्हणाले. त्यावर लोकसेवक पठाण यांनी "मी गेट पास ठेवला हाय खाली सिक्युरिटी मॅडम आहे तुम्ही लाईन किंवा काय लावु नका तिथ सिक्युरिटी मॅडमला सांगितले आहे. तिथ जावून तुम्ही गेट पास घ्या व दुस-या मजलावर चिट्टी दाखवा तिथ साहेबांना भेटा असे

सांगीतले. त्यावेळी तक्रारदार यांनी साहेबांचे नाव विचारले असता 1/3 टेबलला जावून भेटा असे सांगून फोन बंद केला.

त्यानंतर आम्ही तक्रारदार वाडेकर व पंच क्र. 01 शेरखाने यांना लोकसेवक पठाण यांचे साहेबांची समक्ष भेट घेण्याकरीता पाठविण्यासाठी व्हॉईसरेकॉर्डर 15.25 वा. सुरु करुन तक्रारदार वाडेकर यांचे अंगातील शर्टाचे आतील बाजूस असलेल्या बनियानचे आत अडकावून पंच नं. 1 शेरखाने यांचेसह तक्रारदार यांचेकडील काळया रंगाचे होंडा शाईन कंपनीचे मोटार सायकल क्र. एम एच 13.डी. यू. 5912 वरुन मा. आयुक्त, कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी, कार्यालय सुरवसे टॉवर रेल्वे लाईन, सोलापूर येथे पठाण यांचे साहेबांना भेटणे करिता रवाना केले. सदर वेळी पंच नं. 2 कांबळे व आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय सोलापूर येथे थांबुन राहीलो.

काही वेळाने तक्रारदार वाडेकर व पंच 01 शेरखाने तक्रारदार वाडेकर यांचेकडील मोटार सायकल वरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय सोलापूर येथे परत आले. सदर वेळी आम्ही तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर 16.15 वा. काढून बंद करून ताब्यात घेतला व पंच नं. 1 शेरखाने यांना तक्रारदार यांचे सोबत लोकसेवक पठाण यांच्या साहेबांची भेट घेण्याकरीता गेल्यानंतर काय घडले याबाबतची हकीकत मला व पंच नं. 2 कांबळे यांना सांगा असे सांगितले. तेव्हा पंच नं. 01 शेरखाने यांनी हकीकत सांगितली की, मी व तक्रारदार वाडेकर असे तक्रारदार यांचे मोटार सायकल वरुन मा. आयुक्त कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी, कार्यालय सुरवसे टॉवर रेल्वे लाईन, सोलापूर येथे गेले. सदर ठिकाणी तक्रारदार वाडेकर यांनी तेथील सिक्युरीटी मॅडम यांना त्यांचे नाव सांगुन गेट पास घेवुन 1/3 टेबल चे अधिकारी यांना त्यांचे नाव सांगुन ..अमोल चंद्रकांत वाडेकर केस नंबर था..सलमान पठाण ने भेटायला सांगितल होत असे म्हणाले. त्यावेळी तेथील अधिकारी यांनी "कौन सलीम पठाण" असे म्हणून हुआ है सब हुआ है, फाईल तो हुआ है वाडेकर का हुआ है सर स्नेहा का हुआ है और दोनो बच्चो का अभी देना है असे म्हणाले. तक्रारदार वाडेकर यांनी तेथील अधिकारी यांचे सोबत त्यांचे भावाचे कामाबाबत चर्चा करुन त्यांना वारंवार पठाण यांना ओळखता का त्यांना फोन वर बोला असे म्हणून विनंती केली परंतु तेथील अधिकारी यांनी मी कोण पठाण यांना ओळख नाही व मी कोणाशी फोनवर बोलत नाही. असे म्हणाले. त्यानंतर लोकसेवक पठाण यांचे बाबत चौकशी केला असता काही माहिती मिळाली नाही. त्यानंतर मी व तक्रारदार वाडेकर असे त्यांचेकडील मोटार सायकल वरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय सोलापूर येथे परत आलो अशी हकीकत सांगीतली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार वाडेकर यांना लोकसेवक पठाण यांची भेट घेण्यासाठी गेल्यानंतर काय घडले याबाबत हकिकत विचारली असता त्यांनी देखील पंच 01 शेरखाने यांचे प्रमाणेच हकीकत सांगीतली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचे गळयातून काढून घेतलेला व्हाईस रेकॉर्डर त्यांचेकडील संगणकाला लावून झालेले संभाषण पाहिले असता सदरचे संभाषण आम्ही दोन्ही पंच व तक्रारदार यांनी ऐकले असता ते पंच क्र. 01 शेरखाने व तक्रारदार यांनी वर सांगीतले प्रमाणे संभाषण झाल्याचे निष्पन्न झाले.

तक्रारदार वाडेकर यांनी सांगीतलेल्या हकीकत प्रमाणे तक्रारदार वाडेकर यांचे मयत भाऊ अमोल वाडेकर यांचे मृत्यु विमा, पीएफ फरक व पेन्शनचे बील काढून देणेकरिता लोकसेवक पठाण यांनी

साहेबांचे नाव सांगुन तक्रारदार वाडेकर यांचेकडे ॲडव्हान्स म्हणून प्रथम दहा हजार रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती पाच हजार रुपये लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेवक पठाण यांनी बोलाविले नंतर त्यांचेवर सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरवून दिनांक 14/10/2025 रोजीची सदरची कारवाई स्थगित करण्यात आली. वरील दोन्ही पंच यांना दि. 15/10/2025 रोजी 15/00 वा. लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, सोलापूर येथे उपस्थित राहणेबाबत सुचना देवून पाठविण्यात आले.

दि. 15/10/2025 रोजी दुपारी 15/00 वा. वर नमुद दोन्ही पंच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर येथील कार्यालयात उपस्थित राहिले. सुमारे 16/00 वा. तक्रारदार श्री. वाडेकर हे कार्यालयात उपस्थित झाले व त्यांनी पंचासमक्ष सांगीतले की, त्यांना लोकसेवक पठाण यांचा आज सकाळी 11/20 वा. सुमारास तक्रारदार वाडेकर यांना लोकसेवक पठाण यांनी त्यांचा मोबा. क्र. 9307863029 वरून फोन आला व त्यांनी तक्रारदार वाडेकर यांना रु. 10,000/- घेवून येण्यास सांगीतले असता तक्रारदार यांनी रु. 5,000/- घेवून येतो असे सांगीतल्याचे पंचासमक्ष आम्हास सांगीतले.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व तक्रारदार वाडेकर तसेच सापळा पथकास सापळापुर्व पंचनामा कारवाई सुरू करण्यात येत असल्याबाबत सांगितले. त्यानंतर आमचे सुचनेनुसार तक्रारदार वाडेकर यांना दोन्ही पंचांसमक्ष लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी लाच रक्कम 5,000/- रुपये हजर केले. त्यानंतर पोह/पकाले यांनी नमुद नोटांचे नंबर पंच क्र. 02 कांबळे यांचे मदतीने कागदावर लिहुन काढले. त्यानंतर पोह/पकाले यांना ॲन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिल्या असता, पोह/पकाले यांनी कापसाच्या बोळयाने प्रत्येक चलनी नोटांच्या दोन्ही बाजूस ॲन्थ्रासीन पावडर लावली व त्यांनतर पोह/पकाले यांनी सदर लाचेची रक्कम तक्रारदार वाडेकर यांच्या नेसणीस असलेल्या शर्टाच्या वरील डाव्याबाजूच्या खिशात ठेवली. त्यानंतर आम्ही पंचांना तक्रारदार व पोलीस पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून त्यांना योग्य त्या प्रमाणे सूचना दिल्या.

त्यानंतर तात्काळ सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरवले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना पडताळणी व सापळा कारवाई यशस्वी झाल्यास लोकसेवकाची "अंगझडती व लाचेची रक्कम"जप्त करण्याच्या कारवाईचे चित्रीकरण नवीन सिलबंद मेमरी कार्ड मध्ये करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये ईव्हिएम कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड त्यांचे पाकिटातून बाहेर काढले ते व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले. व्हॉईस रेकॉर्डर चालू करून त्याबाबत माहिती दिली तसेच त्याचे इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे उपस्थित सर्वांची खात्री करून दिली. त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेवक पठाण यांची कोठे भेट होईल याबाबत विचारले असता. त्यांनी लोकसेवक पठाण यांना फोन करून विचारावे लागेल असे सांगीतले. त्याप्रमाणे तक्रारदार यांचे वर नमुद मोबाईल क्रमांकावरून लोकसेवक पठाण यांचे मोबाईल क्रमांक 9307863029 यावर 17.24 वा. सुमारास फोन लावून फोन स्पिकरवर ठेवले व आम्ही व्हाईसरेकॉर्डर चालू करून फोनवर होणारे संभाषण ध्वनिमुद्रीत केले. त्यामध्ये झालेले संभाषण सर्वांनी ऐकले असता लोकसेवक पठाण यांनी तक्रारदार यांना मा. आयुक्त, कर्मचारी भविष्य निर्वाहनिधी कार्यालय, सोलापूर येथील कार्यालयाजवळ

रु. 10,000/- घेवून येण्यास सांगीतले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांच्याकडे आज रोजी रु. 5,000/- आहेत उर्वरित रक्कम नंतर देत आहे असे सांगीतले असता लोकसेवक पठाण यांनी ठिक आहे असे म्हणाले. त्यानंतर आम्ही सापळा कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार वाडेकर व पंच क्र. 01 शेरखाने तसेच पंच नं. 2 कांबळे यांचे निवेदन व्हाईस रेकॉर्डव्दारे ध्वनीमुद्रीत करुन घेतले ती वेळ 17.37 वा. ची होती.

त्यानंतर लोकसेवक पठाण यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता तक्रारदार यांना व्हॉईस रेकॉर्डर 17.43 वा. चालू करुन त्यांनी परीधान केलेल्या शर्ट चे आतील बनयिन ला सेफटी च्या सहाय्याने लावुन देऊन शासकिय पंच क्र.1 श्री. शेरखाने यांचेसह तक्रारदार यांचेकडील काळया रंगाचे होंडा शाईन कंपनीचे मोटार सायकल क्र. एम एच 13.डी. यू. 5912 वरुन मा. आयुक्त, कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी, कार्यालय सुरवसे टॉवर रेल्वे लाईन, सोलापूर येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ सापळा पथक शासकिय वाहन क्र. एम.एच. 12 यु.सी. 4098 या मधून रवाना झाले. मा. आयुक्त, कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी कार्यालयाच्या काही अंतरावर शासकिय वाहन कोणास संशय येणार नाही अशा प्रकारे थांबवले व पंच क्र. 02 तसेच सापळा पथक वाहनातून उतरून कार्यालयाच्या जवळ कोणासही संशय येणार नाही अशा रितीने परिसरात थांबून होतो. तक्रारदार व पंच क्र.01 हे लोकसेवक यांचे कार्यालयाचे खाली आस्था हॉस्पीटलच्या बाजूला सिध्दार्थ हाउसिंग सोसायटी समोर गेले. त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार व पंच क्र.1 श्री. शेरखाने यांचे जवळ एक व्यक्ती येवून बोलत उभे राहिला. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे शर्टाचे डावेबाजूकडील खिशातून लाचेची रक्कम काढून त्या इसमासमोर धरले असता ते त्यांनी हाताने स्विकारून त्याचे पॅन्टचे डावे खिशातून एक प्लॅस्टिक पिशवी काढून त्यामध्ये ठेवून त्याचे पॅन्टे डावे खिशात ठेवले त्यानंतर तक्रारदार वाडेकर यांनी त्यांचे डोक्यावरून डावा हात फिरवून लाच स्विकालेचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी आम्ही व सापळा पथक तक्रारदार यांचे जवळ जावून पो.नि. लांभाते यांनी लोकसेवक पठाण यांचा उजवा हात व पोशि/पवार यांनी लोकसेवक पठाण यांचा डावा हात पकडला. त्याचवेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हाईसरेकॉर्डर काढून बंद केला ती वेळी 18/00 वा. ची होती.

त्यानंतर आम्ही लोकसेवक पठाण यांना लाचलुचपत प्रतिबंध विभागाचे अधिकारी असल्याचे सांगून त्यांना हालचाल करण्यास मनाई केली. त्याचवेळी पोह/घुगे यांचे मोबाईलवरून सदर घटनेचे व्हिडीओ रेकॉर्डीग सुरू केले. त्यांनतर आम्ही स्वत:ची व सापळा पथकाची ओळख सांगितली व लोकसेवक पठाण यांना त्यांचे नाव विचारता त्यांनी त्यांचे नाव सलीम हशरफ शेख वय-30 वर्षे रा. 230 उत्तर सदर बझार लष्कर सोलापूर जि.सोलापुर असे असल्याचे सांगून तो मा. आयुक्त, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कार्यालय, सोलापूर येथे दोन महिन्यापुर्वी कॉन्ट्रॅक्ट बेसवर शिपाई म्हणून नोकरीस होता. सध्या तो बेकार असल्याचे सांगीतले.

त्यानंतर आम्ही आरोपी खाजगी इसम सलीम शेख यांना लाच रक्कम कुठे ठेवली आहे याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, पॅटच्या पुढील बाजुच्या डाव्या बाजूच्या खिशात ठेवली असल्याचे सांगीतल्याने ती लाच रक्कम पंच क्र. 2 श्री. कांबळे यांचेकडून काढून घेवून तपासले असता तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांचे क्रमांक तपासून पाहिले असता ते तंतोतंत मिळून आले.

त्यानंतर आरोपी खाजगी इसम सलीम शेख यांना शासकिय वाहनातून लाप्रवि कार्यालय सोलापूर

येथे आणण्यात आले. कार्यालयातील आमचे कक्षातील लाईट बंद करुन कृत्रीम अंधारामध्ये खाजगी इसम सलीम शेख यांनी स्विकार केलेल्या लाच रक्कम अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात पाहिली असता त्यावर फिक्कट हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर खाजगी इसम सलीम शेख यांची तपासणी केली असता त्यांचे दोन्ही हाताला ॲन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट हिरवट रंगांची चकाकी दिसून आली. त्यानंतर पंच क्र. 01 श्री. शेरखाने यांना सापळा कारवाईदरम्याने लाचेची रक्कम खाजगी इसम शेख यांना देण्यासाठी गेल्यानंतर काय घडले हे आमच्या समक्ष पंच क्र. 02 यांना सांगा असे म्हणालो असता पंच क्र. 1. श्री. शेरखाने यांनी सांगीतले की,

“मी व तक्रारदार श्री. वाडेकर असे त्यांचे दुचाकी वरून लाचलूचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयातून निघून मा. आयुक्त, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कार्यालय, सोलापूर येथील कार्यालयासमोर जावून तक्रारदार यांनी खाजगी इसम शेख यांना स्पिकर ऑन करून फोन लावला त्यावेळी शेख यांनी तीथे साईडला हॉस्पीटलच्या समोर पार्किंग आहे तेथे चला असे म्हणाले त्यावेळी तक्रारदार यंानी तेथे पार्किंगमध्ये काय बरे ठिक आहे ओ.के असे म्हणाले व आम्ही बाजूच्या हॉस्पीटलच्या पार्किंगमध्ये जावून थांबलो. त्यानंतर काहीवेळाने खाजगी इसम शेख हा आमच्या जवळ आला. त्यावेळी तक्रारदार यांनी तुम्ही कस म्हणाले ते कागद असे म्हणाले. त्यावर खाजगी इसम शेख यांनी कागद कशाला आणलाव असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी तुम्ही म्हणाले की काल घेवून या म्हणून गरज नाही का त्याची असे म्हणाले. त्यावर शेख नको म्हणालो त्याची गरज नाही. असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी ठिक आहे मग राहू दया याची गरज नाही याची सही शिक्यासहित करून आणले असे म्हणाले त्यावेळी शेख यांनी तूम्ही चुकीचा फॉर्म घेवून गेले याची गरज नाही. त्यामध्ये खरच सांगतो मला काहीच मिळत नाही म्हणून ते पहिले दहा म्हणालो मग आत्ता तुम्ही पाच दयाव उदया पाच मारा ऑनलाईन असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी ऑनलाईन मारतो असे म्हणून तक्रारदार वाडेकर यांनी त्यांचेकडील लाचेची रक्कम शेख यांचे समोर धरून मोजून घ्या पाच असे म्हणून समोर धरले असता शेख यांनी त्याचे उजव्या हाताने लाचेची रक्कम स्विकारून ते डाव्या हाताने डाव्या पॅन्टच्या खिशातून प्लॅस्टीकची पिशवी काढून त्यात ती त्यात ठेवून ती पॅन्टच्या डाव्या बाजूच्या खिशात ठेवली त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचा डावा हात डोक्यावर फिरवून लाच स्विकारलेचा नियोजीत इशारा केला त्यावेळी आपण व सापळा पथकाने खाजगी इसम शेख यांना पकडले. त्यानंतर तक्रारदार यांना घडलेल्या घटनेबाबत विचारले असता त्यांनी सुध्दा वरील प्रमाणे हकिकत सांगीतले सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

तरी दि. 13.10.2025 रोजी तक्रारदार अभिजीत चंद्रकांत वाडेकर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि. 13.10.2025 व दि. 14.10.2025 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार अभिजीत चंद्रकांत वाडेकर रा. 3259 उज्वला सेतु खाली, महाव्दार पोलीस चौकी समोर, पंढरपूर ता. पंढरपूर जि. सोलापूर यांचा मयत भाऊ अमोल वाडेकर यांची पत्नी श्रीमती स्नेहा वाडेकर यांनी त्यांचा पीएफ फरक, मृत्यु विमा व पेन्शनचे बील काढणेकरिता सादर केलेल्या प्रस्तावाची खाजगी इसम सलीम हशरफ शेख रा. 230 उत्तर सदर बझार, सोलापूर यांने आपल्या प्रभावाचा वापर करून मा. आयुक्त, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कार्यालय सोलापूर येथील अधिकारी यांचेकडून बील काढून देतो असे सांगून स्वत:साठी व साहेबांसाठी म्हणून सुरूवातीला बीलाचे 20 टक्के रक्कमेची मागणी केली त्यापैकी प्रथम रू. 10,000/- ची मागणी करून तडजोडीअंती

रू. 5,000/- ची मागणी करून ती पंच साक्षीदार यांचे दिनांक 15/10/2025 रोजी 18/00 वा. चे सुमारास मा. आयुक्त, कर्मचारी भविष्य निर्वाहनिधी कार्यालय, रेल्वे लाईन जवळील आस्था हॉस्पीटलच्या बाजूला सिध्दार्थ हाउसिंग सोसायटी समोर समक्ष स्विकारून स्वत:चा आर्थिक फायदा मिळविण्याचा प्रयत्न केला आहे म्हणून माझी खाजगी इसम सलीम हशरफ शेख रा. 230 उत्तर सदर बझार, सोलापूर यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 अ प्रमाणे सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** namdev vitthal bandgar (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

I.I.F.-I (एकीकृत अन् वेषणफॉर्म - १)

14. **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**Name (नाव):** namdev vitthal bandgar

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** pi

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen ) (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल् या/पाहिलेल् या) शारीरिक वैशिष् टये, व् यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन् मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(से ं.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच् या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | - | | **चेचक:** क्र. |

| Deformities / Peculiarities (व् यंग वैशिष् टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच् य सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल् याच खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त् यापेक्षा अधिक तपशील दिल् यास फक् त यातील रकान् यांची नोंद घेतली जाईल)**